९१८८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
वा. नं. ६७)

१७४ सन १८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
सवालांस पातेसवाल
ले. - शिवराम शा.


१७४

# सवालांस पातेसवाले

निबंध

‘हिंदु यूनियन् क्लब्’ नामक संस्थेच्या आश्रयाखालीं चालू असलेली व्याख्यानमाला.

व्याख्यान ७ वें.

विषय—

# सवालांस प्रतिसवाल

अथवा

## प्रो. राजारामशास्त्री भागवत यांनीं केलेल्या ‘ब्राह्मण ह्मणवणारांस सवाल’ या विषयास उत्तरादाखल दोन शब्द.

व्याख्यानकार

## बाळकृष्ण गणेश योगी.

मुंबईंत
तुकाराम जावजी यांच्या
‘निर्णयसागर’ छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.

ता. ४ माहे मार्च सन १८९९.

किंमत १।। आणा.

नमस्तस्मै जगदीश्वराय.

# सवालांस प्रतिसवाल

## अथवा

## प्रो. राजारामशास्त्री भागवत यांनीं केलेल्या 'ब्राह्मण ह्मणवणारांस सवाल' या विषयास उत्तरादाखल दोन शब्द.

तारीख १४ जानेवारी अठराशें नव्याण्णव १८९९ शनिवारीं हिंदुयूनियन क्लबच्या मार्फत येथें प्रो. राजारामशास्त्री भागवत यांनीं वरील विषयावर एक निबंध वाचिला. त्यांतील मुख्य मुद्दे याप्रमाणें होतेः—मुंजीची निशाणी १, बायकांची मुंज २, चातुर्वर्ण्य ३, 'गणानां त्वा' ४, अष्टका ५, व ब्राह्मण ६. या मुद्यांचें त्यांनीं केलेलें विवेचन ऐकण्यापूर्वी श्रोतृसमुदायाची कल्पना फारच निराळी असली पाहिजे, ह्मणजे वरील विषयांचें शास्त्रीयरीत्या यथार्थ विवेचन करून तसें ज्ञान नसलेल्या श्रोत्यांना आपल्या अगाध ज्ञानाचा लाभ करून देतील अशी झालेली असावी असें माझ्या स्वतःच्या अनुभवावरून वाटतें. परंतु पुढें त्यांचें विवेचन झालें तें अगदींच शास्त्रीय परिभाषेच्या विरुद्ध; व त्यामुळें बऱ्याच लोकांचें मन कलुषित झालेलें असावें असें शेवटीं ( व्याख्यान समाप्त झाल्यावर ) दिसून आलें. परंतु मला तर असें वाटतें कीं, या विषयासंबंधानें जर कोणाचीं मनें कलुषित झालीं असतील आणि त्यामुळेंच व्याख्यात्यांच्या संबंधानें अपूज्य बुद्धि झाली असेल तर तसें होण्याचें कारण बिलकुल दिसत नाहीं; कारण

असें कीं, जर त्या दिवशीं अगदीं यथास्थित शास्त्रीय परिभाषेला अनुसरून विवेचन झालें असतें, तर त्यांतील गोष्टी कितीशा लोकांनीं लक्षांत ठेवल्या असत्या याबद्दल शंकाच आहे. मात्र एवढेंच कीं, तेवढ्या वेळेपुरतें बरें वाटलें असतें. व्याख्यान फार सुरेख झालें वगैरे तऱ्हेचे उद्गार निघाले असते. परंतु कोणाला अशी बुद्धि झाली नसती, कीं शास्त्रीबोवांनीं आपल्याला आज चांगला उपदेश केला आहे तर आतां यानंतर होईल तितकी सवड करून आपल्या वेदांत, शास्त्रांत, पुराणांत काय काय सांगितलें आहे, तें पाहूं, ऐकूं, त्याचें मनन करूं, व त्याप्रमाणें कांहीं वागण्याचाही निश्चय करूं. आणि आतां तेंच उलट रीतीनें व्याख्यान झाल्याबरोबर जे येथें कित्येक शास्त्रीबोवांच्या सवालांस उत्तर देण्याजोगे गृहस्थ होते, त्यांना असें वाटूं लागलें, कीं केव्हां एकदां अध्यक्ष साहेब पुढें बोलायाला परवानगी देतील व केव्हां बोलूं, व जे उत्तर देण्याजोगे नव्हते व ज्यांची वेदशास्त्रादिकांवर तर श्रद्धा आहे, त्यांना वाटूं लागलें कीं, आतां पुढें मोठा मजेचा वाद होईल व तो आह्मी ऐकूं. आणि जर त्या दिवशीं आणखी तिसऱ्या प्रकारचे ह्मणजे प्रो. शास्त्रीबोवांच्या भाषणाचा खरा उद्देश काय आहे, तो न समजतां भाषण ऐकलें तें केवळ सिद्धान्तरूपच आहे असें समजून चालणारे असते तर त्यांना असें वाटलें असतें कीं, आतां यावर कोणी प्रतिकूल भाषण न करील व शास्त्रीबोवांनीं प्रतिपादन केले आहेत हेच सिद्धांत येथें जमलेल्या लोकांस मान्य होतील तर बरें होईल. परंतु पुढें अध्यक्ष महाराजांनीं त्याच दिवशीं बोलावयास कोणासच परवानगी दिली नाहीं; यामुळें वरील दोन प्रकारच्या लोकांच्या उत्कट इच्छा जागच्या जागींच राहिल्या. इतकेंच नाहीं, तर आग्रहपुरःसर अध्यक्षांजवळ परवानगी सुद्धां कित्येक लोक मोठ्या जोरानें

ना-१९७८ —



मागूं लागले. असो. या सर्व प्रकारावरून आपणांस इतकेंच लक्षांत ठेवावयाचें कीं, ज्या एका व्याख्यानावरून एकदम अशी निरनिराळ्या लोकांची मनोवृत्ति जागृत झाली, व यांतील खरें तत्त्व काय आहे याची जिज्ञासा प्रत्येकाला उत्पन्न झाली त्या व्याख्यानाबद्दल व्याख्यात्यांना काडीइतका सुद्धां दोष देतां यावयाचा नाहीं. तर उलट या कृत्याबद्दल त्यांच्या ठिकाणीं प्रत्येकाची पूज्यबुद्धिच झाली पाहिजे, आणि ह्मणूनच प्रत्येकानें त्यांचे फार मोठे उपकारही मानले पाहिजेत असें मी समजतों. ह्मणून आतां उत्तरादाखल ह्मणून जे मी दोन शब्द बोलणार आहें त्यांत सुद्धां त्यांच्या भाषणाला असंबद्ध किंवा निरर्गल वगैरें तिरस्कारद्योतक विशेषणें देऊन प्रलाप असें न ह्मणतां त्याला पूर्वपक्षरूप सुप्रलाप असें ह्मणून माझ्या अल्पमतीप्रमाणें त्यांच्या सवालांस उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहें; आणि प्रो. शास्त्रीबोवा यांचाही या व्याख्यानाचा खरें तत्त्व बाहेर यावें व लोकांकडून या गोष्टींचा वारंवार विचार व्हावा असाच हेतु असला पाहिजे हें उघड आहे. नाहीं तर त्यांनीं या व्याख्यानाला सवाल हें नांव दिलें नसतें आणि शेवटीं लोकांकडून यांचा विचार होऊन यथायोग्य जबाब मिळावे या हेतूनें 'सवाल अगदीं उजू आहेत, ह्मणून त्यांचे जबाबही असेच अगदीं उजू येतील अशी आशा आहे' असें ह्मणून वितंडवादांत पडण्याविषयीं आपली नाखुषी प्रदर्शित केली नसती. इतकें सांगून व पुढें कदाचित् कांहीं बोलतांना प्रमाद झाल्यास सदर व्याख्यात्यांनीं व अध्यक्षसाहेबांनीं मी आपला शिष्य आहें असें समजून त्याबद्दल मला क्षमा करावी अशी प्रार्थना करून मूळ विषयाकडे वळतों.

प्रथम वरील ६ विषयांपैकीं पहिल्या विषयाचा ह्मणजे

## १ मुंजीची निशाणी

कोणती? याचा विचार करूं. व्याख्याते ह्मणतात कीं, 'आश्व-

लायनानें मुंजीचा संस्कार सांगितला आहे, त्यांत गायत्रीचा उपदेश अवश्यमेव झाला पाहिजे, पण जानव्याचा उल्लेख कोठेंही केलेला नाहीं.' परंतु मला असें वाटतें कीं, मुंजीची निशाणी गायत्रीमंत्र तर आहेच आहे, परंतु त्याच्या बरोबर मेखला, कृष्णाजिन अथवा वस्त्र, दण्ड व यज्ञोपवीत याही मुंजीच्या निशाण्याच आहेत असें ह्मणावें लागतें. कारण या जर निशाण्या मुख्य नसत्या तर त्यांपैकीं, कांहींतरी नष्ट झालें तर पुनः त्याचा विधिपूर्वक स्वीकार करावयास सांगितला आहे त्याची जरूरी नव्हती. आतां यांचें ह्मणणें आणखी असें आहे कीं, 'आश्वलायनानें जानव्याची इतिकर्तव्यता काय ती सांगितलेली नाहीं त्या अर्थीं जानवें ही मुंजीची निशाणी नव्हे.' तर त्याबद्दल असा विचार केला पाहिजे, कीं आश्वलायनाचें सूत्र आहे तेव्हां सूत्र ह्मणजे त्याचें लक्षण असें आहे कीं, 'अल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतोमुखम्.' ह्या लक्षणाचा विचार केला ह्मणजे असें दिसून येईल कीं, जें थोड्या अक्षरांनीं युक्त असतें, व संशय दूर करणारें, फक्त सारांशाचा बोध करणारें, व सर्व बाजूंनीं सारखें असें असतें तें सूत्र. तेव्हां यावरून पहातां कदाचित् आश्वलायनानें जरी जानव्याचा उल्लेख केला नाहीं, तरी तें त्याच्या मतें त्याज्य किंवा अग्राह्य ठरत नाहीं. तर अवश्यक संग्राह्यच दिसतें. कारण आश्वलायनाचा अभिप्राय असा दिसतो कीं, गृह्यपरिशिष्टांत त्याचा उल्लेख स्पष्ट केला आहे. इतकेंच नव्हे, तर यज्ञोपवीताशिवाय कोणतेंच कृत्य करतां येणार नाहीं असें स्पष्ट सांगितलें आहे व इतर सूत्रकारांनींही जानवें आवश्यक आहे असें सांगितलें आहे. तेव्हां आणखी आपल्या सूत्रांत त्याचा निराळा उल्लेख करण्याची जरूरी दिसत नाहीं. आणि सूत्रकारांची साधारण पद्धत अशीच दिसते. उदाहरणार्थ पाणिनि ऋषींनीं व्याकरणसूत्रें

रचिलीं आहेत. त्यांत ताल्वादिवर्णांचीं (स्वर, व्यंजन वगैरे अक्षरांचीं) स्थानें सांगितलीं नाहींत. परंतु शिक्षेंत त्यांचा स्पष्ट उल्लेख केला आहे व तींच वर्णविचार करावयाच्या वेळीं घ्यावीं असाच पाणिनीचा अभिप्राय समजला पाहिजे. नाहीं तर 'तुल्यास्यप्रयत्नं सवर्णम्' अशासारख्या सूत्राचा अर्थ करतांना मोठी पंचाईत पडेल. त्याच प्रमाणें आश्वलायनानें उपनयनसंस्काराच्या वेळीं यज्ञोपवीताचा उल्लेख केला नाहीं, तथापि अन्यत्र ठिकाणीं उल्लेख केला आहे. तेव्हां मुंजीच्या वेळींच त्याचा स्वीकार झाला पाहिजे हें उघड आहे. आणि असें जर आहे तर ती–यज्ञोपवीत ही–मुंजीची मुख्य निशाणी नव्हे काय? आतां व्याख्यात्यांच्या ह्मणण्याप्रमाणें गायत्री ही मुख्य निशाणी खरी, परंतु ती अन्तःस्थ निशाणी व ही बाह्य निशाणी एवढाच काय तो दोहोंमध्यें फरक आहे. पण जशी गायत्री ही अन्तःस्थ मुख्य निशाणी तशी बाहेरची निशाणी यज्ञोपवीत ह्मणजे जानवें ही मुख्यच आहे. फार तर काय? परंतु ही बाह्य निशाणी जर नसेल तर तो मनुष्य ब्राह्मण नव्हे असें कोण पाहिजे तो ह्मणूं शकेल, आणि तसें ह्मटलें असतां मग त्याला दोषही देतां यावयाचा नाहीं. ज्याप्रमाणें पोलीसशिपायाचा पट्टा ही बाहेरची निशाणी व आंतली निशाणी अधिकाराच्या मानानें कायद्याचें ज्ञान, या दोहोंची त्याला अवश्य जरूर आहे. यांतलें एक–पट्टा–जर त्याजवळ नसेल तर कोणीही त्याला पोलीस अधिकारी असें ह्मणणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर कोण पाहिजे तो त्याला मोठ्या जोरानें सांगूं शकेल कीं, तुझ्याजवळ जर पट्टा नाहीं, तर तूं पोलीसचा शिपाई नव्हेस व असें सांगितल्यावर त्याला एक शब्द सुद्धां तोंडांतून काढतां यावयाचा नाहीं. मग पाहिजे तेवढें कायद्याचें ज्ञान असलें तरी तें व्यर्थ. याचें कारण इतकेंच

कीं, सरकारांतून त्याच्या अधिकाराची खूण ह्मणून पट्टा दिलेला असतो. तो जोंपर्यंत त्याच्याकडे असेल तोंपर्यंत त्याच्याकडे अधिकाराचा जोर आहे असें समजावयाचें. त्याचप्रमाणें सर्व सृष्टीचा अधिपति जो ईश्वर त्याच्याचकडून परंपरेनें यज्ञोपवीत ही द्विजत्वाची खूण ह्मणून मिळालेली आहे आणि ती जोंपर्यंत आपल्याकडे राहील तोंपर्यंतच द्विजत्व आपणाकडे राहील; ती खूण नष्ट होईल त्या वेळीं द्विजत्वही नष्ट होईल; व त्याच्याच बरोबर गायत्रीमंत्राचें तेजही नष्ट होईल हें स्पष्ट सिद्ध होतें. याचें कारण असें कीं, गायत्रीमंत्राचा जप करणें ह्मणजे ज्या जगच्चालक ईश्वरानें आपल्याला ब्राह्मणत्व दिलें त्याच्या अगाध सामर्थ्याचें चिंतन करणें आहे. हें 'तज्जपस्तदर्थभावनम्' या योगसूत्रावरून सिद्ध होतें. ह्मणून त्यानें–ईश्वरानें–दिलेल्या चिन्हाचा –यज्ञोपवीताचा–आपण जर त्याग केला तर ईश्वर सर्वद्रष्टा आहे, त्याला हें दुष्कर्म तेव्हांच दिसून येईल व तो आपलें द्विजत्व हरण करील हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

आतां याबद्दल आश्वलायनपरिशिष्टकार, पारस्कराचार्य, गोभिलाचार्य, मनु वगैरे सूत्रकार व स्मृतिकार काय ह्मणतात त्याचा थोडासा विचार करूं ह्मणजे वरील मुद्याला वरीच वळकटी येईल.

गृह्यपरिशिष्टांत कोणतेंही कर्म करतांना कसें बसावें वगैरे सांगितलें आहे तें याप्रमाणें:–

'कर्ता स्नातो धौतानार्द्रवासा यज्ञोपवीत्याचान्तःप्राङ्मुख आसीनः'

( कोणतेंही कर्म कर्त्या पुरुषानें स्नान करून धुतलेलीं व सुकीं वस्त्रें धारण करून–नेसून व अंगावर घेऊन–आणि यज्ञोपवीत धारण करून, आचमन करून पूर्वेकडे तोंड करून बसावें. )

आतां पारस्कराचार्य काय ह्मणतात तें पहाः–

त्यांनीं प्रथम मुंजीच्या संस्कारास सुरवात करून ब्रह्मचारी यास काय काय द्यावें हें सांगतांना वस्त्र, मेखला हीं द्यावीं असें सांगून पुढें—

'यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात्
आयुष्यमग्र्यं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः'
'यज्ञोपवीतमसि यज्ञस्य त्वा यज्ञोपवीतेनोपनह्यामि'

( यज्ञोपवीत हें अतिशय पवित्र आहे. कारण तें सृष्टीच्या आरंभीं ब्रह्मदेवाबरोबर उत्पन्न झालें आहे.—यावरून यज्ञोपवीत परंपरेनें ईश्वराकडूनच मिळालें आहे हें लक्षांत ठेवावें–ह्मणूनच तें श्रेष्ठ व ( धारण केल्यानंतर ) आयुष्य देणारें आहे. हें शुभ्र ( रंगाचें ) तूं धारण कर व हें यज्ञोपवीत बलकारक व तेजोवर्धक होवो. यज्ञाच्या–श्रौतस्मार्त वगैरे कर्मांच्या–संबंधानें यज्ञोपवीत हें तुझें नांव आहे. ह्मणून यज्ञोपवीत याच नांवानें ( मी ) बांधतों—गळ्यांत घालतों.)

या दोन मंत्रांनीं यज्ञोपवीताचें विधान सांगितलें आहे. आतां कदाचित् प्रोफेसर साहेब ह्मणतील कीं, हें पारस्कराच्या सूत्रांतलें नव्हे, बाहेरचें आहे. कबूल, परंतु याच सूत्राचे भाष्यकर्ते हरिहराचार्य काय ह्मणतात तें पाहिलें ह्मणजे शंकेला जागा रहाणार नाहीं—

'अत्र यद्यपि सूत्रकारेण यज्ञोपवीतधारणं न सूत्रितं तथाप्येकवस्त्राः प्राचीनावीतिनः इति प्रेतोदकदाने प्राचीनावीतित्वविधानात्–'दण्डाजिनोपवीतानि मेखलां चैव धारयेत्' इति याज्ञवल्क्येन ब्रह्मचारिणः उपवीतधारणस्मरणात्, तथा 'सदोपवीतिना भाव्यं सदा बद्धशिखेन च। विशिखो व्युपवीतश्च यत्करोति

न तत्कृतम्' इति छन्दोगपरिशिष्टे कात्यायनेन सामान्यतः सर्वाश्रमिणां सदा यज्ञोपवीतधारणस्मरणात् यज्ञोपवीतधारणं तावदुपनयनप्रभृति प्राप्तम् । तच्च कुत्र कर्तव्यमित्यवसरापेक्षायां औचित्यान्मेखलाबन्धनानन्तरं युज्यते । एतदेव कर्कोपाध्याय-–वासुदेवदीक्षित—रेणुदीक्षितप्रभृतयः स्वस्वग्रन्थे यज्ञोपवीत-धारणमन्त्रावसरे लिखितवन्तः तच्च सर्वकर्माङ्गत्वान्मन्त्रवद्युज्यत इति मन्त्रमपि शाखान्तरीयं लिखितवन्तः । ततोऽत्र 'यज्ञोपवीतं परमं पवित्रं०' इति माणवकपठितमन्त्रेण उपवीतं परिधापयति आचामयति च अथ तूष्णीमैणेयमजिनमुत्तरीयं करोति ॥'

ह्याचा अर्थ येणेंप्रमाणेंः—येथें जरी सूत्रकारानें—पारस्क-राचार्यानें—यज्ञोपवीत धारण सांगितलें नाहीं, तथापि 'एकवस्त्र-युक्त प्राचीनावीत ह्मणजे डाव्या हाताखालीं व उजव्या खां-द्यावर जानवें घातलेले होऊन (प्रेतक्रिया करावी) असें ह्म-णून प्रेताला उदकदान करण्याच्या वेळीं प्राचीनावीतित्वाचें वि-धान केलें आहे. त्यावरून व दण्ड, कृष्णाजिन, यज्ञोपवीत आणि मेखला हीं धारण करावीं, असें ह्मणून याज्ञवल्क्यऋषींनीं ब्रह्मचाऱ्याला यज्ञोपवीतधारण सांगितलें आहे. तसेंच (ब्राह्म-णानें) सदोदित यज्ञोपवीतयुक्त व शेंडी बांधून असावें. आणि याच्या उलट यज्ञोपवीतविरहित आणि शेंडी मोकळी सोडून जें कर्म करितो तें न केल्यासारखें समजावें. असें छन्दोगपरिशिष्टांत कात्यायनानें सामान्यतः सर्व आश्रम्यांना सदोदित यज्ञोपवीताचें धारण सांगितलें आहे. ह्मणून यज्ञो-पवीतधारण हें उपनयनकालापासूनच प्राप्त आहे. तर मग मुंज करतेवेळीं तें केव्हां घालावें अशी आकांक्षा उत्पन्न झाली असतां एवढ्या विशेष योग्यतेचें तें असल्यामुळें व पुढें कोणत्याच कर्माला त्याशिवाय अधिकारही नसल्यामुळें मेखला-

बन्धनानन्तरच त्याचें धारण करणें योग्य आहे. आणि कर्कोपाध्याय, वासुदेव दीक्षित, रेणुदीक्षित वगैरे ग्रंथकारांनीं आपापल्या ग्रंथांमध्यें याच वेळीं—मेखलाबन्धनानन्तर—यज्ञोपवीताचें धारण करावें असें लिहिलें आहे. आणि तें सर्व कर्मांचें अङ्ग असल्यामुळें मन्त्रयुक्त त्याचा स्वीकार करणें वाजवी आहे. यास्तव मन्त्र सुद्धां दुसऱ्या शाखेंतील त्यांनीं स्वीकारिला आहे. ह्मणून येथें—उपनयनकालीं—'यज्ञोपवीतं परमं पवित्रं' या माणवकपठित मन्त्रानें यज्ञोपवीत (ब्रह्मचाऱ्याकडून) घालवावें व आचमन करवावें आणि त्यानंतर कृष्णाजिन वस्त्र वगैरे हीं अमन्त्रकच द्यावीं.

तेंव्हां आतां यावरून 'यज्ञोपवीत ह्मणजे उपवस्त्र व तें यज्ञाच्या वेळींच घ्यावयाचें व यज्ञ आटोपला, कीं यज्ञोपवीत खुंटीवर अडकवलेंच' हें विधान कोठपर्यंत टिकेल याचा विचार वाचकांनीं अगर श्रोत्यांनींच करावा.

आतां 'इतर कपड्यांप्रमाणें गरीबगुरिबांनीं जानवें गळ्यांतून काढून घरीं धुवावें व ज्यांस सामर्थ्य आहे अशा लोकांनीं तें परटाकडे द्यावें व त्यावर इस्तरी वगैरेही करावी' इत्यादि ह्मणण्यांत कितीसा खरेपणा आहे तो गोभिलाचार्य, मनु वगैरे यांच्या ग्रंथांवरून पाहूं:—

'यज्ञोपवीतिनाऽऽचान्तोदकेन कृत्यम्'

(कोणतेंही श्रौतस्मार्त वगैरे कर्म करणारानें यज्ञोपवीत धारण करून आणि आचमन करून करावें.)

असें गोभिलगृह्यसूत्रांत आरंभींच सांगितलें आहे. आतां येवढ्यावरून सुद्धां सदोदितच यज्ञोपवीत असावें किंवा नाहीं याचा चांगलासा खुलासा होत नाहीं अशी शंका उत्पन्न हो-

ण्याचा संभव आहे, ह्मणून अगोदर त्याचें निराकरण करणें जरूरीचें आहे. वर जीं प्रमाणांदाखल वचनें नमूद केलीं आहेत त्यांत सर्वत्र 'यज्ञोपवीती' असा शब्द वापरण्यांत आला आहे. ह्या शब्दांत मूळ यज्ञोपवीत शब्दाला मत्वर्थीय इनि प्रत्यय (तद्धित) लागून सवंध 'यज्ञोपवीती' हा शब्द निष्पन्न झाला आहे. व वरील प्रत्यय नित्ययोग–सदोदित असणें—या अर्थीं होतो. हें 'तदस्यास्त्यस्मिन्निति मतुप्' या पाणिनीयसूत्रावर कात्यायन ऋषींचें

'भूम-निन्दा-प्रशंसासु नित्ययोगेऽतिशायने।
संबन्धेऽस्तिविवक्षायां भवन्ति मतुबादयः।'

(बहुत्व अथवा महत्त्व, निन्दा, प्रशंसा, नित्ययोग, अतिशयपणा, संबन्ध–स्वस्वामिभाव वगैरे—, आणि अस्ति–आहे–अशा अर्थाची विवक्षा असतां मतुप्, इनि वगैरे प्रत्यय होतात.) असें वार्तिक आहे त्यावरून सिद्ध होतें. यावरून सुद्धां यज्ञोपवीत पाहिजे तेव्हां गळ्यांतून काढतां येणें अगर धुतां येणें इत्यादि गोष्टी शास्त्रदृष्ट्या शक्य आहेत काय?

आतां यज्ञोपवीत कोणत्या तऱ्हेचें असावें याचा विचार करूं. वर जें गोभिलगृह्यसूत्राचें वाक्य दाखल केलें आहे त्याच्याच वरील भाष्यांत 'यज्ञोपवीतं कुरुते सूत्राणि नवतन्तवः।' (ज्यांत नऊ तन्तु आहेत अशीं तीन सूत्रें मिळून एक यज्ञोपवीत करावें.' ही व

'कार्पासमुपवीतं स्याद् विप्रस्योर्ध्ववृतं त्रिवृत।
शणसूत्रमयं राज्ञो वैश्यस्याविकसौत्रिकम्॥'

(ब्राह्मणाचें यज्ञोपवीत कापसाचें असून त्रिगुणित—तीनदां विणलेलें—व उजव्या बाजूनें पीळ घातलेलें असावें, आणि रा-

बा. १११८८



जाचें सणाच्या सूत्राचें असावें, आणि वैश्याचें मेंढ्याच्या केंसांचें असावें.) ही मनुस्मृति अशा दोन स्मृति दाखल केलेल्या आहेत. इतकेंच नाहीं तर असें यज्ञोपवीत धारण करणें हें पुरुषार्थाला कारण आहे असेंही सिद्ध केलें आहे. तसेंच प्रत्यक्ष सूत्रकार दुसऱ्या काण्डिकेच्या आरंभीं ह्मणतात कीं,

'यज्ञोपवीतं कुरुते सूत्रं वस्त्रं वाऽपि वा कुशरज्जुमेव ।'

( यज्ञोपवीत सुताचें करावें, किंवा वस्त्राचें अगर दर्भाचें करावें—येथें 'कुरुते' हें क्रियापद विधिबोधक आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. )

आणि याच्या वरील भाष्यांत खालील स्मृतिवाक्यें दाखल केलीं आहेत.

'त्रिवृदूर्ध्ववृतं कार्यं तन्तुत्रयमधोवृतम् ।
त्रिवृतं चोपवीतं स्यात् तस्यैको ग्रन्थिरिष्यते ॥
कौपं सौत्रं वा त्रिवृत् यज्ञोपवीतमानाभेः ।
यथा यज्ञोपवीतं च धार्यते च द्विजोत्तमैः ।
तथा संधार्यते यत्नादुत्तराच्छादनं परम् ॥
यज्ञोपवीते द्वे धार्ये श्रौत-स्मार्तेषु कर्मसु ।
तृतीयं चोत्तरीयार्थे वस्त्रालाभे तदिष्यते ॥'

या वाक्यांचा अर्थ येणेंप्रमाणेः—यज्ञोपवीत करतांना त्रिवृत्-त्रिगुणित-करून त्याला उजव्या बाजूनें पीळ घालावा व पुनः त्रिगुणित करून उलट बाजूनें पीळ घालावा व तदनंतर त्याला एक गांठ मारावी. यज्ञोपवीत रेशमाचें किंवा सुताचें असून तें त्रिगुणित असावें; व बेंबीपर्यंत पोंचेल इतकें लांब असावें. जसें द्विजांनीं यज्ञोपवीत धारण केलें जातें, त्याचप्रमाणें मोठ्या यत्नानें उपवस्त्रही धारण करावें. श्रौतस्मार्त वगैरे कर्में करण्या-

साठीं नेहमीं दोन यज्ञोपवीतें धारण करावीं—येथें 'श्रौतस्मार्तेषु कर्मसु' ही सप्तमी 'निमित्तात्कर्मयोगे' या वार्तिकानें कर्मांचा व यज्ञोपवीताचा नित्यसंबंध आहे हें दाखविण्याच्या हेतूनेंच केली आहे ह्मणून कर्मांच्या ठायीं किंवा कर्मांच्या वेळींच यज्ञोपवीत धारण करावयाचें असा अर्थ करावयाचा नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे—आणि तिसरें यज्ञोपवीत हें जर उपवस्त्र नसेल तर त्याच्या ऐवजीं धारण करावें.

वर निर्दिष्ट केलेल्या सूत्रांत 'वस्त्रं वापि कुशरज्जुमेव' असें ह्मटलें आहे. त्याचें कारण असें कीं, एखादे वेळीं मनुष्य प्रवासांत असतां रानांत जानवें तुटलें अथवा कांहींतरी कारणानें हरवलें तर आयत्या वेळीं मिळणार नाहीं व यज्ञोपवीत तर अवश्य असलें पाहिजे; याकरितां यज्ञोपवीताचें काम वस्त्रावर भागवावें आणि कदाचित् चोरादिकांनीं वस्त्रेंही चोरून नेलीं तर दर्भमय यज्ञोपवीत करावें. असो. हीं जीं वर प्रमाणभूत वाक्यें दिलीं आहेत त्या सर्वांचा यथायोग्य विचार केला असतां शास्त्रीबोवांनीं केलेलीं सर्व विधानें कोणत्या प्रकारचीं आहेत हें निराळें सांगण्याची जरूरी वाटत नाहीं. त्यांतच प्रो. रा. शास्त्रीबोवा यांनीं 'उपवस्त्र नसेल तर सुताचें जानवें करावें' अशा तऱ्हेचें जें एक विधान केलें आहे, तें—

'वाससा यज्ञोपवीतानि कुरुते तदभावे त्रिवृता सूत्रेण'

असें एक परिशिष्टवाक्य याच—गोभिलसूत्राच्या—भाष्यांत पूर्वपक्षरूपानें दाखल करण्यांत आलें आहे, त्यावरून असेल असें वाटतें. परंतु सदर्हु भाष्यकारांनीं पुढें 'तत्र यज्ञोपवीतपदमुत्तरीयपरम्' ( वरील वाक्यांत 'यज्ञोपवीत' पद उपवस्त्रार्थी आहे ) असें ह्मणून नीट व्यवस्था केली आहे. आणि 'काण्व वगैरे कांहीं विवक्षित शाखेचे ऋषी पूर्वीं गळ्यांतून जानवें काढून

धूत होते' अशा अर्थाचा एक श्लोक पुढें करण्यांत आला आहे; परंतु त्याच्या पूर्वीं तीर्थयात्रेसारख्या विशेष प्रसंगीं तसें करावें अशा अर्थाचा अर्धा भाग आहे. याच संबंधानें कोणाला जास्त खुलासा करून घ्यावयाचा असल्यास वे. शा. सं. काशीनाथशास्त्री लेले यांनीं आपल्या व्याख्यानांत केला आहे तो पहावा; आतां जानवें कसें घालावें याचा विचार करूं. याबद्दल गोभिलगृह्यसूत्रांत नियम आहे तो असाः—

'दक्षिणं बाहुमुद्धृत्य शिरोवधाय सव्येंऽसे प्रतिष्ठापयति दक्षिणं कक्षमन्ववलम्बं भवत्येवं यज्ञोपवीती भवति। सव्यं बाहुमुद्धृत्य शिरोवधाय दक्षिणेंऽसे प्रतिष्ठापयति भवत्येवं प्राचीनावीती भवति।

याचा अर्थ येणेंप्रमाणेंः—जानवें घालतांना प्रथम उजवा हात वर करून डोक्याच्या पाठीमागच्या बाजूनें नेऊन डाव्या खांद्यावर ठेवावें; ह्मणजे तें डाव्या खांद्यावर व उजव्या कांखेच्या खालीं राहणारें असें होतें, आणि अशा रीतीनें जानवें घातलें ह्मणजे तो पुरुष यज्ञोपवीती होतो. तसेंच डावा हात वर करून त्याच्या खालून घेऊन पूर्वींप्रमाणें उजव्या खांद्यावर ठेवलें, ह्मणजे उजव्या खांद्यावरून डाव्या कांखेच्या खालीं लोंबेसें केलें ह्मणजे तें प्राचीनावीत होतें. अशा रीतीनें जानवें घालणाराला प्राचीनावीती असें ह्मणतात. (गोभिलगृह्यसूत्र प्रपाठक १, कांडिका २.)

मनुस्मृतींतही याचप्रमाणें सांगितलें आहे. तें असेंः—

'उद्धृते दक्षिणे पाणावुपवीत्युच्यते द्विजः।
सव्ये प्राचीन आवीती निवीती कण्ठसज्जने॥'

याचा अर्थ पूर्वींच्या सूत्राप्रमाणेंच आहे, परंतु कोणत्याच हाताखालीं न घेतां नुसतें गळ्यांत घालून बेंबीपर्यंत पोंचेल अशा बेतानें मधोमध जानवें केलें ह्मणजे त्याला निवीती असें ह्मणतात, एवढेंच काय तें ह्यांत विशेष आहे. तसेंच मुंजीच्या

वेळीं मेखला वगैरे जीं चिन्हें ब्रह्मचाऱ्याला दिलेलीं असतात, त्यांपैकीं एखादें जर छिन्न भिन्न झालें, अथवा सांडलें लोटलें तर त्याबद्दल मनूनें काय सांगितलें आहे तें पहाः—

'मेखलामजिनं दण्डमुपवीतं कमण्डलुम् ।
अप्सु प्रास्य विनष्टानि गृह्णीतान्यानि मन्त्रवत् ॥'

अर्थः—मेखला, कृष्णाजिन, दंडकाष्ठ, यज्ञोपवीत, आणि कमंडलु यांपैकीं जर कांहीं सांडलें अथवा तुटलें तर तें पूर्वीचें तुटकें अथवा सांडलेलें पुनः मिळालें तरी तें पाण्यांत टाकून देऊन दुसरें आपआपल्या शाखेचे मंत्र ह्मणून पुनः नवीन घालावें. या सर्व प्रमाणांवरून 'जानवें ह्मणजे काय,' 'अगदीं पूर्वींच्या ब्राह्मणाचें जानवें सुताचें होतें काय' हे पोटसवाल व त्यांचेही पोटसवाल 'जानवें बाकीच्या वस्त्रांप्रमाणें बाणकोट्यांजवळून किंवा धोब्यांकडून धुववण्यास अडचण कोणती' वगैरे हे अगदीं निष्प्रमाण होऊं पाहतात, तसेंच 'धोब्याकडे देऊन कुंदी किंवा इस्तरीही करण्यास सांगावी,' वगैरे विधानें लंगडीं पडतात, आणि यज्ञोपवीत ह्मणजे सुताचें जानवें, तें सदोदित गळ्यांत असावें, सांडलें किंवा तुटलें तर पुनः नवीन मंत्रपूर्वक दुसरें घालावें हीं विधानें मात्र वरील सर्व प्रमाणांवरून दृढ होऊं पाहतात. वर जीं प्रमाणें दिलीं आहेत तीं सर्व सूत्रांतील स्मृतींतील आहेत. श्रुतींत सुद्धां अशाबद्दल पुष्कळ प्रमाणें मिळूं शकतील. परंतु ज्यांना वर दिलेलीं सूत्रें व स्मृती हीं मान्य आहेत त्यांना दुसरीं प्रमाणें देऊन उगीच मंडळीचा वेळ घेणें मला प्रशस्त वाटत नाहीं. आणि जर कोणाची श्रुतींतीलही प्रमाणें पाहण्याची अथवा वाचण्याची उत्कट इच्छा असेल तर त्यांनीं वे. शा. रा. रा. काशीनाथशास्त्री लेले यांचें ता. २१ जानेवारी शनिवारीं रोजीं याच विषयावर दोन तास लांबलचक व्याख्यान झालें होतें,

त्याचीं पुस्तकें आतां छापून प्रसिद्ध झालीं आहेत त्यांत पहावीं आणि संशयनिवृत्ति करून घ्यावी. येथपर्यंत जानव्यासंबंधी जेवढा माझ्यानें करववेल व मंडळीकडूनही ऐकवेल तेवढा विचार झाला. परंतु आणखीही एक गोष्ट सांगण्याची जरूरी वाटत आहे. ती ही कीं, कदाचित् जर कोणास अथवा खुद्द व्याख्यात्यांसही अशी शंका येईल कीं मूळ सवालांत मुख्यतः आश्वलायनाच्या सूत्रांत सुताच्या जानव्याचा उल्लेख नाहीं तसाच गोभिलसूत्रांतही नाहीं, तसेंच ऋग्वेदांतलें किंवा यजुर्वेदांतलें सुताचें जानवें नव्हे, सामवेदांतलें आहे; तेव्हां ऋग्वेद्यांस किंवा यजुर्वेद्यांस सुताच्या जानव्याची जरूर नाहीं, एवढाच काय तो मुख्य मुद्दा आहे. तेव्हां वर दिलेल्या प्रमाणांनीं ह्याचें चांगलेंसें निराकरण होत नाहीं, तर त्याच्याबद्दल एवढेंच सांगावयाचें कीं, ही गोष्ट धर्मसंबंधी आहे आणि धर्मसंबंधी गोष्टींचा विचार करावयाचा ह्मटला ह्मणजे तो एकाच ग्रंथावरून किंवा एकाच मनुष्याकडून होणें शक्य नाहीं. याबद्दल बौधायनसूत्रांत असें सांगितलें आहे कीं;—

**"शिष्टाः खलु विगतमत्सरा निरहंकाराः कुम्भीधान्या अलोलुपा दम्भ-दर्प-लोभ-मोह-क्रोधपरिवर्जिताः तदभावे दशावरापरिषत्; अथाप्युदाहरन्ति 'चातुर्वैद्यं विकल्पी च अङ्गविद्धर्मपाठकः। आश्रमस्थास्त्रयो विप्राः पर्षदेषा दशावरा' इति."**

ह्याचें तात्पर्य असें कीं, ऋषिकाळीं धर्मबाबीसंबंधीं विचार करण्याचा प्रसंग आला ह्मणजे त्या वेळीं ऋषींची एक मोठी धर्मसभा जमत असे आणि त्या सभेकडून धर्मसंबंधी सर्व गोष्टींचा विचार होत असे; असें पूर्वीपासून चालत आलें आहे. तेव्हां पुढेंही लोकांनीं धर्मसंबंधी निर्णय करावयाचा असल्यास चांगल्या विद्वान् लोकांची सभा नेमून त्या सभेकडून हा निर्णय करून घ्यावा. हें सांगण्याचा सूत्रकाराचा उद्देश दिसतो.

आणि त्या सभेंत लोक कशा प्रकारचे असावेत तें वरील वाक्यानें दर्शविलें आहे. तें असें:—धर्मसंबंधी सभेंत शिष्ट, मत्सररहित, अहंकाररहित, एका दिवसापुरतें धान्य संग्रह करणारे, (उद्यां कसें होईल ही काळजी न करणारे) निर्लोभी, दंभ, (ढोंग) गर्व, लोभ, मोह, (कोणतीही आवडती वस्तू पाहिल्याबरोबर भुलून जाणें) आणि क्रोध, हे त्यांच्या ठिकाणीं नसावे असे लोक सभेंत असावे आणि अशा गुणांनीं युक्त असून पुष्कळ लोक नसतील तर विद्वान् दहा लोकांनीं सुद्धां सभा होऊं शकते. ते दहा लोक येणेंप्रमाणें:—चार वेद जाणणारे चार, एक उदासीन, एक वेदांचीं सर्व अंगें (सूत्र निरुक्त वगैरे जाणणारा), एक केवळ धर्म जाणणारा, आणि तीन आश्रमांचे तीन ब्राह्मण अशा प्रकारचे दहा इसम असले ह्मणजे त्या सभेस दशावरा असें ह्मणतात. हें सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, धर्मसंबंधी गोष्टींचा निर्णय एका ग्रंथावरून किंवा एका मनुष्याकडून होणें शक्य नाहीं ह्मणून वर दर्शविलेल्या निरनिराळ्या विद्या जाणणारे लोक असावे. आणि अशा लोकांकडून जो धर्मनिर्णय होईल तो सर्व बाजूंनीं निर्दोष होईल. तेव्हां अर्थातच आपल्याला असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं कीं, यज्ञोपवीताचें विधान कदाचित् एका आश्वलायनगृह्यसूत्रांत अथवा एका ऋग्वेदांत नसलें तरी ज्या इतर सूत्रांत, अथवा इतर वेदांत सांगितलेलें आहे तेथें अमुकच एका विवक्षित शाखेच्या लोकांनीं जानव्याचा स्वीकार करावा आणि तदितर लोकांनीं करूं नये अशा उद्देशानें सांगितलेलें नाहीं, तर सर्वसाधारण असें सांगितलें आहे. आणि ह्मणूनच मन्वादिस्मृतिकारांनींही सर्वसाधारण ह्मणूनच सांगितलें आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आणि ह्मणूनच उपवस्त्र व यज्ञोपवीत या दोहोंची अर्थानें बरोबरी होऊं शकत नाहीं.

त्या कारणानें 'जसा 'वस्' धातूचा, तसा 'व्ये' धातूचाही अर्थ संस्कृत भाषेंत झांकणें होतो.' इत्यादि ह्मणणें बरोबर नाहीं. कारण 'वस आच्छादने' आणि 'व्येञ् संवरणे' हे दोन धातू निरनिराळ्या अर्थीं पाणिनीनें पठन केले आहेत. त्यांपैकीं पहिल्याचा—वस् धातूचा—आच्छादन ह्म० झांकणें असा अर्थ व दुसऱ्याचा—व्येञ् धातूचा—संवरण ह्म० वेष्टन करणें असा होतो. वेष्टन ह्मणजे झांकणें नव्हे तर सभोंवतीं गुंडाळणें. तें मग सुतासारख्या वारीक तंतूंनीं होतें किंवा वस्त्रानेंही होतें. परंतु एवढ्यानें 'उपवीत'—उपवस्त्र—असें मात्र ह्मणतां यावयाचें नाहीं. कारण तो शब्द जानवें या अर्थींच रूढ आहे. ह्मणून शास्त्रकारांनीं वस्त्र या अर्थीं त्याचा उपयोग केलेला नाहीं. आणि कदाचित् संवरण ह्मणजे झांकणें असा अर्थ जरी मानला तथापि त्याच्या पाठीमागें 'उप' हा उपसर्ग लागल्यामुळें तो अर्थ राहिला नाहीं. असें 'उपसर्गेण धात्वर्थो वलादन्यत्र नीयते' या प्रमाणावरून ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. कसेंही जरी मानलें तथापि 'उपवीत' ह्मणजे डाव्या खांद्यापासून उजव्या बाजूच्या कंबरेच्या भागापर्यंत जें वेष्टन केलेलें असतें तें असें पूर्वीं दाखल केलेल्या शास्त्रप्रमाणावरून ह्मणणें योग्य वाटतें. आणि असें आहे ह्मणूनच प्रसिद्ध अमरकोशकर्ता अमरसिंह यानें सुद्धां 'उपवीतं ब्रह्मसूत्रं प्रोद्धृते दक्षिणे करे । प्राचीनावीतमन्यस्मिन्निवीतं कण्ठलम्बितम्' असें ह्मणून जानव्याच्याच प्रकारांचें वर्णन केलें आहे.

आतां दुसऱ्या—

## २ बायकांची मुंज.

या विषयाकडे वळूं. या विषयासंबंधानें विचार करावयाचा ह्मणजे प्रथम ज्या आश्वलायन वगैरे सूत्रकारांचा पुरावा पुढें करण्यांत आला आहे तेच सूत्रकार व मनु वगैरे स्मृतिकार

आपापल्या ग्रंथांत याबद्दल काय ह्मणतात तीं वचनें पुढें आणूं; ह्मणजे मग व्याख्यानकारांचे सवाल कसे पुढें आले आहेत हें आपोआप व्यक्त होईल. प्रथम आश्वलायन व त्यांच्या सूत्राचे वृत्तिकार—टीकाकार—उपनयनाबद्दल काय ह्मणतात तें पहाः— 'अष्टमे वर्षे ब्राह्मणमुपनयेत्' (आठव्या वर्षी ब्राह्मणाचें उपनयन करावें) असें आश्वलायनाचें सूत्र आहे. त्याची टीका येणें प्रमाणेंः—

'जन्मप्रभृत्यष्टमे वर्षे ब्राह्मणमुपनयेत् ।
कुमारमिति वर्तते कुमारीनिवृत्त्यर्थमित्युक्तम् ॥'

ह्मणजे 'आठव्या वर्षी ब्राह्मणाची मुंज करावी' अशा अर्थाच्या वरील सूत्रांत जेथून आश्वलायनांनीं जातकर्मादिसंस्कारांचा विधि सांगावयास आरंभ केला आहे, तेथें पहिलें सूत्र 'कुमारं जातं पुरान्यैरालम्भात्' असें आहे तेथून 'कुमारं' या शब्दाची अनुवृत्ति येते. ही अनुवृत्ति आणण्याचें कारण कुमारीची ह्मणजे कन्येची निवृत्ति करण्यासाठीं. तात्पर्य हेंच कीं, उपनयनसंस्कारांत कन्येचें ग्रहण होऊं नये यासाठीं सूत्रांत मुद्दाम 'कुमार' असा पुल्लिंगी शब्द घातला आहे. तेव्हां जर आश्वलायनाला स्त्रियांची मुंज इष्ट असती तर सूत्रांत वरील शब्द घालण्याची मुळींच जरूर पडली नसती. अशाच अर्थाचीं पारस्कर, गोभिल वगैरे ऋषींचीं सूत्रें आहेत. तसेंच मनुस्मृतींत—

'वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः ।
पतिसेवा गुरौ वासो गृहार्थोऽग्निपरिक्रिया ॥'

(स्त्रियांचा विवाहविधिच उपनयनसंस्कार आहे, विवाहित पतीची सेवा करणें हाच (वेदाध्ययनाकरितां) गुरुगृहीं वास, व सर्व गृहकृत्य चांगल्या प्रकारें करणें हीच होमादिरूप अग्नीची सेवा.) असा श्लोक आहे. परंतु व्याख्यानकारांनीं नकळल्या-

सारखें करून एवढ्या प्रसिद्ध स्मृतिकर्त्या मनूला कोणतासा ग्रंथकार ठरवून त्याचें ह्मणणें एका विवक्षित शाखेला अनुसरून आहे, सार्वत्रिक नव्हे असें दर्शविलें आहे. हें त्यांनीं कोणत्या आधारावरून ह्मटलें असेल तें त्यांचें त्यांस ठाऊक. मला तर खात्रीनें असें वाटतें कीं, मनुस्मृति किंवा इतर स्मृतीही कोणत्या तरी विवक्षित शाखेच्याच नसून सर्वसाधारण आहेत. कारण त्यांचा आरंभच तसा असतो. उदाहरणार्थ मनुस्मृतींतच प्रथम ऋषींनीं प्रश्न केला आहे:—

'भगवन् सर्ववर्णानां यथावदनुपूर्वशः ।
अन्तरप्रभवाणां च धर्मान्नो वक्तुमर्हसि ॥'

( हे भगवन्, ब्राह्मण, क्षत्रिय वगैरे सर्व वर्णांचे, ( जातींचे ) व संकरजातींत उत्पन्न झालेल्या लोकांचे ( महार, सुतार वगैरेंचे ) [हें वरील श्लोकाच्या टीकेंतील अर्थाप्रमाणें लिहिलें आहे, माझ्या पदरचें नव्हे. ] सर्वधर्म क्रमानें आह्मांला सांगा. हे सांगण्याला आपणच योग्य आहांत. ) यावरून मनुस्मृति एकाद्या विवक्षित शाखेकरितां, अथवा विवक्षित जातीकरितां नसून सर्वशाखांच्या, जातींच्या लोकांकरितां आहे. इतकें असून सुद्धां हें मान्य नसेल तर एका गोभिलसूत्रावरील भाष्यांत स्त्रियांच्या उपनयनाबद्दल भाष्यकारांनीं सप्रमाण आपले विचार प्रदर्शित केले आहेत ते पहा.—हें मूळसूत्र कन्येच्या विवाहप्रकरणसंबंधीं आहे.

'प्रावृतां यज्ञोपवीतिनीमभ्युदानयन् जपेत्–सोमोऽददद्गन्धर्वायेति'

यज्ञोपवीताप्रमाणें—डाव्या खांद्यावरून व उजव्या कांखेखालून –पदर घेतलेल्या कन्येच्या हाताला धरून अग्नीच्या संमुख आणतांना पतीनें 'सोमोददद्गन्धर्वाय गन्धर्वोददद्ग्नये' इत्यादि

मन्त्र ह्मणावा. ) असा याचा अर्थ आहे. आतां भाष्यांत 'यज्ञोपवीतिनीं' याच्याबद्दल निर्णय केला आहे तो असाः—

'यज्ञोपवीतं यज्ञोपवीतवत् विन्यासविशिष्टमुत्तरीयं तत् यस्या अस्ति सेयं यज्ञोपवीतिनी ताम्' यज्ञोपवीतवत् परिहितोत्तरीयवसनामित्यर्थः । तदाभ्यां पदाभ्यां पूर्वत्र सूत्रितयोर्वाससोर्विन्यासविशेषमिह दर्शयति 'यज्ञोपवीतपदं चोत्तरीयेऽपि प्रयुज्यते विन्यासविशेषलाभार्थम्' इति पुरस्तात् (वाससा यज्ञोपवीतानि कुरुते ) अभिहितमस्माभिः। यज्ञोपवीतवतीमित्येव कुतो न वर्ण्यते ? तदभावादित्याह—न खल्वस्ति योषितां यज्ञोपवीतं येनानुद्येत । अनुमीयतामिति चेत् स्यान्मतम् अस्मादेवानुवादात् योषितामपि यज्ञोपवीतमनुमीयताम् । न अन्यथोपपत्तेः । अन्यथैवोपपन्नोयमनुवादो न विधिमनुमापयितुमलम् । अनन्यथासिद्धः खल्वनुवादो विधिमनुमापयति । सिद्धवदुपदेशाच्चासिद्धिः । सिद्धवत्खल्वेतदुपदिश्यते यज्ञोपवीतिनीम् इति । सिद्धं खल्वासां यज्ञोपवीतशब्दमुत्तरीयं न यज्ञोपवीतम् । तस्मादसिद्धिर्योषितां यज्ञोपवीतस्य।'

याचा अर्थ—यज्ञोपवीत ह्मणजे यज्ञोपवीताप्रमाणें रचना केलेलें ( डाव्या खांद्यावरून व उजव्या कांखेखालून घेतलेलें ) उत्तरीय जिनें घेतलें आहे तिला यज्ञोपवीतिनी ह्मणावयाचें. तात्पर्य यज्ञोपवीताप्रमाणें उपवस्त्र घेतलेली इतकेंच समजावयाचें. तेव्हां 'प्रावृतां यज्ञोपवीतिनीं' या दोन पदांनीं पूर्वीच्या सूत्रांत सांगितलेलीं वस्त्रें घेण्याची रीति सांगितलेली आहे. उपवस्त्र घेण्याची रीत समजली पाहिजे यासाठीं यज्ञोपवीत पदाचा उत्तरीयार्थींही प्रयोग क्वचित् स्थळीं केला जातो असें आह्मीं पूर्वी ( 'वाससा यज्ञोपवीतानि कुरुते' या सूत्राच्या व्याख्यानांत ) सांगितलेंच आहे. आतां कदाचित् यज्ञोपवीत ( जानवें ) जिनें घातलें आहे असाच वरील सूत्राचा अर्थ कां समजूं नये ? अशी

शंका येण्याचा संभव आहे. परंतु पुढें त्याचा निकाल केला आहे तो याप्रमाणें—ज्याचा अनुवाद करावयाचा तें पूर्वीं कोठें तरी विधिपूर्वक सांगितलेलें असलें पाहिजे. जसें पूर्वीं प्रतिपादन केल्या-प्रमाणें 'मुंजीच्या वेळीं यज्ञोपवीत घालावें' असा पारस्कर वगैरे सूत्रकारांनीं एकदां यज्ञोपवीताचा विधि सांगितला आणि मग 'यज्ञोपवीतिनाऽऽचान्तोदकेन' इत्यादि सूत्रांनीं आणि 'सदा यज्ञोपवीतिना भाव्यं' इत्यादि स्मृतिकारांनींही त्याचा अनुवाद केला आहे. परंतु स्त्रियांसंबंधानें पूर्वीं कोठेंही यज्ञोपवीताचें विधान नसल्यामुळें स्त्रियांना यज्ञोपवीताचा संबंध मुळींच लागूं शकत नाहीं. बरें याच वाक्यावरून विधीची कल्पना करावी असेंही ह्मणतां यावयाचें नाहीं. कारण दुसऱ्या रीतीनें 'यज्ञोपवीतिनीं' या शब्दाची उपपत्ति करतां येते. तेव्हां दुसऱ्या रीतीनें उपपन्न असलेल्या शब्दाबद्दल विधिविषयक कल्पना करणें योग्य नाहीं. ज्या अनुवादाची अन्य रीतीनें उपपत्ति होत नाहीं, त्याच ठि-काणीं विधीची कल्पना करावयाची. आणि सिद्धवत् ( अन्य रीतीनें सिद्ध होणारा ) उपदेश असल्यामुळें स्त्रियांना यज्ञोपवी-ताची सिद्धि होत नाहीं. 'यज्ञोपवीतिनीं हा सुद्धां सिद्धवदुपदेशच आहे. आणि स्त्रियांना यज्ञोपवीतशब्दानें त्याप्रमाणें उत्तरीय धारण करणें हें सिद्ध आहे ह्मणून स्त्रियांनीं यज्ञोपवीत ( जानवें ) धारण करणें ही गोष्ट सिद्ध होत नाहीं.

ही झाली गोभिलगृह्यसूत्राची वाट. याचप्रमाणें आश्वलायन, पारस्कर वगैरे सूत्रकारांनीं आणि मन्वादिस्मृतिकारांनींही पुरु-षांच्या उपनयनसंस्काराच्या विधानाप्रमाणें स्त्रियांच्या उपनयन-संस्काराचें विधान कोठेंही सांगितलेलें नाहीं. तेव्हां स्त्रियांच्या मुंजीची कल्पना सूत्रकारांच्या वचनावरून मनांत येणें शक्य दिसत नाहीं. ह्मणूनच मनांत आलेल्या कल्पनेवरून उगीच मोठ-

मोठ्या सूत्रकारांचीं अगर स्मृतिकारांचीं नांवें घेऊन त्यांची व आपली तुलना करणें केव्हांही बरोबर होणार नाहीं. श्रुतींतही स्त्रियांच्या उपनयनाविषयीं कोठें उल्लेख केलेला नाहीं.

आतां स्त्रियांच्या मुंजीबद्दल थोडासा एके ठिकाणीं उल्लेख केलेला दिसतो, तो हाः—

**'द्विविधाः स्त्रियो ब्रह्मवादिन्यः सद्योवध्वश्च । तत्र ब्रह्मवादिनीनामुपनयनमग्नीन्धनं वेदाध्ययनं स्वगृहे च भिक्षाचर्या ॥'**

असें हारीतस्मृतींतील वाक्य पराशरस्मृतीवरील माधवांच्या पराशरमाधवनामक टीकेंत आढळतें. याचा अर्थ येणेंप्रमाणें:— ब्रह्मवादिनी आणि सद्योवधू अशा दोन प्रकारच्या स्त्रिया आहेत. त्यांपैकीं ब्रह्मवादिनी स्त्रियांचें उपनयन, होम, वेदाध्ययन व भिक्षाटन हीं स्वगृहींच करावीं.

यावरून आजन्म ब्रह्मचारिणी राहून ब्रह्मज्ञान संपादन करण्याची ज्यांची इच्छा असेल अशा स्त्रियांचें उपनयन करावें व त्यांस वेदाध्ययनही सांगावें हें सिद्ध होतें. परंतु ज्यांची प्रपंचांत राहण्याची इच्छा असेल अशा स्त्रियांचें मौंजीबंधन करावें अशाबद्दल कोठेंही ( श्रुतिस्मृतींत वगैरे ) आधार नाहीं.

**'पुराकल्पे तु नारीणां मौञ्जीबन्धनमिष्यते ।**
**अध्यापनं च वेदानां सावित्रीवाचनं तथा ॥**
**पिता पितृव्यो भ्राता वा नैनामध्यापयेत्परः ।**
**स्वगृहे चैव कन्याया भैक्षचर्या विधीयते ॥**
**वर्जयेच्चाजिनं चीरं जटाधारणमेव च ।'**

(पूर्वींच्या कल्पामध्यें स्त्रियांचें मौंजीबन्धन होत असे. त्यांना वेदांचें अध्ययन, सावित्रीमंत्राचा उपदेश, हीं कन्येचा पिता, पितृव्य ह्मणजे चुलता अथवा बन्धु यांपैकीं कोणींतरी करावीं. यांशिवाय अन्य पुरुषाला अध्ययन वगैरे करविण्याचा अधिकार नाहीं. तसेंच

स्त्रियांचें भिक्षाटनही स्वगृहींच करावें व कृष्णाजिन आणि जटाधारण हीं वर्ज करावीं. ) या स्मृतिवचनावरून पूर्वकल्पीं स्त्रियांचें मौंजीबन्धन होत असे इतकें सिद्ध होतें. तेंही पण प्रापंचिक स्त्रीविषयक आहे असें ह्मणतां येत नाहीं. कारण स्त्रियांचा विवाहकाल जो शास्त्रकारांनीं सांगितलेला आहे त्याचा आणि उपनयनाचा मेळ मुळींच बसत नाहीं. स्त्रियांचा विवाहकाल शास्त्रांत सांगितला आहे तो याप्रमाणें:—

प्रथम गृह्यसूत्राचा काय अभिप्राय आहे तो पाहूं. यांत:—

**'उदगयन आपूर्यमाणपक्षे कल्याणे नक्षत्रे चौलकर्मोपनयन-गोदान-विवाहाः । सार्वकालमेके विवाहम् ।'**

(उत्तरायणांत, शुक्लपक्षांत आणि ज्योतिःशास्त्रांत सांगितलेल्या उत्तम नक्षत्रीं चौल, उपनयन, गोदान आणि विवाह हीं कर्में करावीं. कित्येक आचार्य सर्वकालीं ( उदगयन शुक्लपक्ष वगैरे यांची अपेक्षा न करितां ) विवाह करावा असें ह्मणतात. ) विवाहसंबंधानें असा उल्लेख आहे. यांतील शेवटल्या ( 'सार्वकालमेके' इत्यादि ) वाक्याच्या टीकेंत सर्वकालीं विवाहविधानाचें कारण काय याचा विचार करतांना असें सांगितलें आहे:—

**'एके आचार्याः सर्वस्मिन् काले विवाहमिच्छन्ति । नोदगयनादिनियमः । तेषां कोऽभिप्रायः? दोषश्रवणात्—'ऋतुमत्यां हि तिष्ठन्त्यां दोषः पितरमृच्छति' इति । अन्ये च लौकिका दोषाः समुत्पद्यन्ते ॥'**

( कित्येक आचार्य सर्वकालीं विवाह करावा असें इच्छितात. उदगयनाचा वगैरे नियम मानीत नाहींत. असें मानण्याचा त्यांचा काय बरें अभिप्राय? तर ( कन्या अविवाहित राहिली असतां ) दोष सांगितला आहे. त्याला प्रमाण 'कन्या अविवाहित राहून जर ऋतुमती झाली तर तो दोष तिच्या पित्याला स्वीका-

रावा लागतो.' अशा अर्थाचें स्मृतिवचन आहे. आणखीही ( कन्या अविवाहित राहिली असतां ) लौकिक दोष पुष्कळ उत्पन्न होतात.)

यावरून स्त्रियांचा विवाहकाल अगदीं सीमा ह्मणजे बारा वर्षांच्या तरी आंतच आश्वलायनाच्या मतें ठरतो. कारण बारा वर्षांनंतर स्त्रियांना रजोदर्शन होतें असें वाग्भट वगैरे वैद्यक-ग्रंथांत सांगितलेलें आहे आणि तें होण्याच्या पूर्वीं तर लग्न झालें पाहिजे असें धर्मशास्त्र सांगतें.

आतां गोभिलगृह्यसूत्र व त्याचें भाष्य ह्यांत स्त्रियांच्या विवाहकालाविषयीं काय निर्णय केला आहे त्याचा थोडासा विचार करूं.

**'अनुज्ञातो दारान् कुर्वीत । असगोत्रान्,**
**मातुरसपिण्डान्, नग्निका तु श्रेष्ठा ।'**

ब्रह्मचर्य समाप्त झाल्यावर गुरुजींची आज्ञा घेऊन स्त्रीचा स्वीकार करावा व जी कन्या करावयाची ती आपल्या गोत्रांत उत्पन्न झालेली नसावी, किंवा मातेच्या संबन्धाची ( नात्याची ) नसावी आणि ती होतां होई तोंपर्यंत ऋतु प्राप्त झालेली नसावी. असें मूळ गोभिलाचें गृह्यसूत्र आहे.

आतां याच सूत्रावरील भाष्यांत वरीलचशीं स्मृतिवचनें दाखल केलीं आहेत तीं पहा. मूळ सूत्रांत 'नग्निका' असें पद आहे तेव्हां तें कोणाला लागू होतें याबद्दलः—

**'यावन्न लज्जाशालिनी कन्या पुरुषसंनिधौ । योन्यादि नाव-गूहेत तावद्भवति नग्निका ॥'**

ह्मणजे पुरुषाच्या संनिध असतां जोंपर्यंत कन्येच्या ठिकाणीं लज्जा उत्पन्न झाली नाहीं, व जननेंद्रियादिक आच्छादन केलेलीं नाहींत तोंपर्यंत त्या कन्येला नग्निका असें ह्मणतां येतें.

तसेंच याच सूत्रावर गृह्यवाक्यें ह्मणून दिलीं आहेत तींही लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत ह्मणून येथें दाखल करतों.

'नग्निकां तु वदेत् कन्यां यावन्नर्तुमती भवेत् । ऋतुमती त्वनग्निका तां प्रयच्छेत्तु नग्निकाम् ॥ अप्राप्ता रजसो गौरी प्राप्ते रजसि रोहिणी । अव्यञ्जिता भवेत् कन्या कुचहीना च नग्निका ॥ व्यञ्जनैस्तु समुत्पन्नैः सोमो भुञ्जीत कन्यकाम् । पयोधरैस्तु गन्धर्वा रजसाऽग्निः प्रकीर्तितः । तस्माद्व्यञ्जनोपेतामरजामपयोधराम् । अभुक्तां चैव सोमाद्यैः कन्यकां तु प्रशस्यते ॥'

ह्मणजे जोंपर्यंत कन्या ऋतुमती झाली नाहीं तोंपर्यंत तिला नग्निका असें ह्मणावें आणि ऋतुमती झाली कीं ती अनग्निका झाली. ह्मणून जी नग्निका ( रजोदर्शन झालेली नसेल ) अशाच कन्येचें दान करावें. तसेंच जिला रजोदर्शन झालें नाहीं तिला गौरी असें ह्मणतात व रजोदर्शन झाल्यानंतर तिला रोहिणी असें नांव देण्यांत येतें. आणि (स्त्रीत्वाला योग्य अशीं) चिन्हें रोमावली वगैरे जोंपर्यंत दिसूं लागलीं नाहींत व जोंपर्यंत स्तनोद्भव झाला नाहीं, तोंपर्यंत ती नग्निका असते—अशाच अभिप्रायानें अमरकोशकारानेंही 'नग्निकाऽनागतार्तवा' असाच उल्लेख केलेला आहे—आणि हीं चिन्हें दिसूं लागलीं ह्मणजे त्या कन्येचा उपभोग सोम घेतो, स्तन उत्पन्न झाले ह्मणजे गन्धर्व उपभोग घेतात आणि रजोदर्शन झालें ह्मणजे अग्नि उपभोग घेतो. ह्मणून जोंपर्यंत कन्येचे ठिकाणीं वरील चिन्हें दिसूं लागलीं नाहींत, रजोदर्शन झालें नाहीं, स्तन दिसूं लागले नाहींत आणि जोंपर्यंत सोमादिकांनीं तिचा उपभोग घेतला नाहीं, तोंपर्यंतच तिचें दान करणें हें प्रशस्त आहे.

त्रिंशद्वर्षो वहेद्भार्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम् ।
त्र्यष्टवर्षोऽष्टवर्षां वा धर्मे सीदति सत्वरः ॥ (मनु.)

ह्मणजे ३० वर्षांच्या पुरुषानें १२ वर्षांच्या मुलीशीं लग्न करावें किंवा २४ वर्षांच्या पुरुषानें ८ वर्षांच्या मुलीशीं विवाह करावा. या मनुस्मृतीवरून सुद्धां पुरुषाच्या लग्नाची मात्र जास्तींत जास्त अवधि ३० वर्षांपर्यंत अथवा कमींत कमी २४ वर्षांपर्यंत ठरविलेली आहे. परंतु कन्येच्या विवाहाची अवधि १२ वर्षांपुढें व ८ वर्षांच्या आंत ठेवलेली नाहीं. असो. या सर्व सूत्र व स्मृतिप्रमाणांवरून स्त्रियांची मुंज सशास्त्र ठरत नाहीं. ह्मणूनच 'वायकांची मुंज वाजवी कीं गैरवाजवी?' या सदराखालीं व 'वायकांची मुंज सशास्त्र कीं अशास्त्र?' याही सदराखालीं 'आईबाप जर उभयतां ब्राह्मण असतील तर त्यांच्या मुलांस ब्राह्मण ह्मणतां येईल. ब्राह्मणाचींही मुलें उपजत शूद्र असून मुंज होते तेव्हांच त्यांस ब्राह्मण ह्मणवून घेण्याचा अधिकार येतो. जर मुलीची मुंज झाली नाहीं तर ती उघड शूद्र झाली. ती ब्राह्मण ह्मणतां येत नाहीं,' असें विधान ठोकून देऊन 'ब्राह्मणवर्णांतल्या मुलींची मुंज होईल, तेव्हांच तीस ब्राह्मणत्व येईल. जर मुंज झाली नाहीं, तर ब्राह्मणत्व येत नाहीं, असेंच समजणें वाजवी होत नाहीं काय?' इत्यादि पुढें आणलेले सवाल व तत्संबंधीं सर्व विधानें निवळ निराधार ह्मणूनच स्वकपोलकल्पित अथवा निदान लोकांना चिडविण्यासाठीं तरी केलेलीं आहेत असें ह्मटल्यावांचून गत्यंतर नाहीं. आणि या वरील दाखविलेल्या प्रमाणांवरून 'जशी वायकांची तशी सुतारांसोनारांचीही मुंज सशास्त्र आहे. कलियुगांतही ती अर्थातच झाली पाहिजे. जे ब्राह्मण ह्मणविणारे आज जशी स्त्रियांची तशी सुतारांसोनारांचीही मुंज लावण्यास तयार नसतील ते ब्राह्मणी शास्त्राचा उच्छेद करण्यासाठीं जन्मलेल्या असुरांपैकीं किंवा राक्षसांपैकीं मानल्या ह्मटल्यास अतिशयोक्तीचा आरोप येईल काय?' या

जबरदस्त सवालावर दुसरा एक प्रतिसवाल पुढें येऊं पहातो. तो हा कीं, जशी बायकांची तशी सुतारांसोनारांचीही आश्वलायन, पारस्कर, गोभिल वगैरे सूत्रकारांनीं व मन्वादि स्मृतिकारांनींही-ते सुतार (वगैरे) त्रैवर्णिकांतील नसल्यामुळें—मुंज करावी असें कोठेंही सांगितलेलें नसल्यामुळें अशास्त्र आहे, सशास्त्र नव्हे. ह्मणून कलियुगांतही अर्थातच होणें इष्ट नाहीं. ह्मणूनच जे ब्राह्मण ह्मणविणारे आज जशी स्त्रियांची तशी सुतारांसोनारांचीही मुंज लावण्यास तयार नाहींत त्यांवर शास्त्रोच्छेदकत्वाचा व असुरत्व किंवा राक्षसत्वाचा आरोप विनाकारण करूं पहाणें ह्मणजे अतिशयोक्ति इतकेंच नव्हे तर एक प्रकारचें साहसच करण्यास प्रवृत्त झाल्यासारखें होणार नाहीं काय?

आतां 'सोडमुंजींत आणलेलें अनुलेपन "ब्राह्मणानें आपल्या तोंडास, क्षत्रियानें आपल्या बाहूंस, वैश्यानें आपल्या पोटास, स्त्रीनें आपल्या मांडीच्या वरच्या भागास, सरणजीवीनें आपल्या मांडीच्या खालच्या भागास पहिल्यानें फांसावें." असें आश्वलायन ह्मणतो.' असें विधान करून व्याख्यात्यांनीं 'जशी स्त्रियांस तशी सुतारांसोनारांसही जर सोडमुंज होती—अग्निहोत्राचा अधिकार श्रुतीनें उपकुष्ट ह्मणून सुतारांसोनारांस उघड दिलेला आहे—तर मुंजही उघड असली पाहिजे.' असें एक अनुमान काढलें आहे. त्यासंबंधानें थोडासा विचार करूं. सोडमुंजीच्या वेळच्या अनुलेपन वगैरे संबंधानें आश्वलायनगृह्यसूत्रांत विधि आहे तो असाः—

**'अनुलेपनेन पाणी प्रमृज्य मुखमग्रे ब्राह्मणोऽनुलिम्पेत्, बाहू राजन्यः, उदरं वैश्यः, उपस्थं स्त्री, ऊरू सरणजीविनः. (गृ. सू.)**

याचा अर्थ असाः—ब्राह्मणानें प्रथमतः अनुलेपनानें आपले हात लिंपून—तें आपल्या हातांस फांसून—मग त्या हातांनीं

तोंडास लावावें. राजानें वाहूंस, वैश्यानें पोटास, स्त्रीनें आपल्या जननस्थानीं व सरणजीवीनें आपल्या मांड्यांस लावावें. हें खरें आहे परंतु हा विधि फक्त सोडमुंजीपुरताच आहे किंवा सार्वकालिक आहे याचा मात्र थोडासा विचार केला पाहिजे. तो याच सूत्रावरील टीकेच्या अनुरोधानें करूं. ती टीका येणेंप्रमाणें:—

**'उपस्थं स्त्री अग्रेऽनुलिम्पेत् ऊरू सरणजीविनः। अग्रेऽनुलिम्पेरन् अयं विधिः सार्वत्रिकः। कुतः स्त्रीविधानात्॥'**

ह्या टीकेचा अर्थ वरील सूत्रापेक्षां कांहीं निराळा नाहीं. परंतु यांत इतकेंच सांगितलें आहे कीं, हा अनुलेपनाचा विधि केवळ सोडमुंजीपुरताच नसून सार्वत्रिक ह्मणजे जेव्हां जेव्हां अनुलेपन करण्याचा प्रसंग येईल त्या त्या वेळेचा आहे. कशावरून? तर स्त्रीचें ग्रहण केलें आहे ह्मणून. असा एकंदरींत शेवटीं निकाल केलेला आहे. आणि यांत सरणजीवी ह्मणजे कोण हें स्पष्ट सांगितलेलें नाहीं तेव्हां 'सरणजीवी शब्दानें टीकाकार सुतार सोनार वगैरे धंदेवाल्या जाती समजतो.' हें कोणत्या आधारानें ह्मटलें असेल तें ज्यांचें त्यांस माहीत. बरें कदाचित् सुतार सोनार वगैरे जरी जाती वरील शब्दानें घेतल्या तरी हा—अनुलेपनाचा—विधि सार्वत्रिक असल्यामुळें कांहीं अडचण येत नाहीं. एकंदरींत कोणत्याही रीतीनें पाहिलें तरी स्त्रियांची तशीच सुतारांसोनारांचीही मुंज सशास्त्र नाहीं असें ह्मणण्यास मला कांहीं प्रत्यवाय वाटत नाहीं. आणि दुसरें असें कीं, स्त्रियांची जर मुंज केली तर जसें पुरुषांस त्याचप्रमाणें स्त्रियांसही ४८, ३६, २४ किंवा निदान १२ वर्षें तरी ब्रह्मचारिव्रतानें राहिलें पाहिजे.—आतां जसा हल्लीं पुरुषांच्या मुंजीचा व तिच्या बरोबरच ब्रह्मचर्याचाही 'उपनयन–विवाहावुत्सवैकप्रधानौ' या न्यायानें निवळ फार्स होत आहे, त्याचप्रमाणें स्त्रियांचाही करा-

वयाचा असेल तर गोष्ट निराळी—आणि सशास्त्र करावयाचें ह्मणजे त्याप्रमाणें करणें रास्त आहे. आणि तसें करावयास तयार व्हावयाचें ह्मणजे अगदीं कनिष्ठपक्षीं सुद्धां शास्त्रोक्त विवाह-कालाचें उल्लंघन करावें लागणार व जवळ जवळ तारुण्यावस्था संपून वृद्धावस्था प्राप्त व्हावयाच्या वेळीं लग्न करण्याचा प्रसंग येणार व त्याबरोबर मग अर्थातच सर्व प्रपंचाचें अव्यवस्थित स्वरूप करण्याची पाळी येऊन पोंचणार. तेव्हां अशा एका मागून एक अनर्थपरंपरेची पाळी येऊं देण्यापेक्षां ज्या स्त्रियांची—कुमा-रिकांची-अगर त्यांच्या पालकांची निरंतर—आजन्म—ब्रह्मवादिनी होण्याची अथवा ठेवण्याची इच्छा असेल व त्याबरोबरच दृढतर मनोनिग्रह करण्याचें सामर्थ्य असेल त्यांनीं पाहिजे तर आपल्या कन्यकांचें मौंजीबंधन करावें. परंतु प्रपंचांत राहूं इच्छिणाऱ्या स्त्रियांची मुंज शास्त्ररीत्या करणें कधींही रास्त होणार नाहीं. आणखीही या संबंधानें पुष्कळ वैद्यक वगैरे शास्त्रांच्या अडचणी दाखवितां येतील, परंतु कितीही प्रमाणें दाखविलीं तरी तात्पर्य इतकेंच निघावयाचें. यामुळें उगीच मंडळीचा वेळ घेणें मला बरोबर वाटत नाहीं. ह्मणून हा विषय इतक्यावरच पुरा करितों.

आतां पुढील 'चातुर्वर्ण्य', 'गणानां त्वा', 'अष्टका' आणि 'ब्राह्मण' या चार विषयांपैकीं 'चातुर्वर्ण्य' व 'ब्राह्मण' या दोन विषयांसंबंधानें मला येथें विचार करावयाचा नाहीं. त्या दोन विषयांसंबंधानें ज्यांना निर्णय करून घ्यावयाचा असेल त्यांनीं वे. शा. काशीनाथशास्त्री लेले यांनीं येथील ब्राह्मणसभेंत 'चा-तुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' या भगवद्गीतेवरील श्लोकावर एक मोठें व्याख्यान दिलें होतें, तें आतां छापून प्रसिद्धही झालें आहे त्यावरून करून घ्यावा. माझेंही मत त्याचप्रमाणें—चातु-र्वर्ण्य उत्पत्तिसिद्धच आहे असेंच—आहे. तेव्हां त्याहून आ-

णखी निराळें मला कांहीं सांगावयाचें नाहीं. आणि आजपर्यंत जातिभेदासंबंधानें पुणें, मुंबई वगैरे शहरीं मोठमोठ्या लोकांचीं व्याख्यानें व त्यावर मोठमोठे वादविवाद सुद्धां झालेले आहेत तेव्हां त्यांत मला नवीन असेंही कांहीं वाटत नाहीं. ह्मणून त्याची येथें लिहिण्याची फारशी जरूरी वाटली नाहीं ह्मणून तें लिहिलें नाहीं. तेव्हां आतां राहिले दोन विषय 'अष्टका' व 'गणानां त्वा'. यांसंबंधानें सुद्धां मला फार कांहीं सांगावयाचें नाहीं. 'अष्टका' श्राद्धासंबंधानें शास्त्रीबोवा यांच्या ह्मणण्याप्रमाणें आश्वलायनगृह्यसूत्रांत विधान आहे. तें ज्यांस यथाविधि साधेल त्यांनीं करावें. परंतु मांस आणि सुरा या दोहोंचा उल्लेख शास्त्रीबोवांच्या ह्मणण्याप्रमाणें जरी आश्वलायनसूत्रांत आहे, तथापि सांप्रतच्या कालांत यथाविधि तें कृत्य—पशुवध वगैरे—होणें दुर्लभ आहे व पराशर, मनु वगैरे स्मृतिकारांनीं कलियुगांत मद्य—मांसाचा निषेधही सांगितलेला आहे तेव्हां तेवढें सोडून इतर जसीं हल्लीं बाकीचीं श्राद्धें करतात त्याचप्रमाणें अष्टकाश्राद्धही करावें, व तें आवश्यक कर्मांपैकींही एक आहे एवढेंच यासंबंधानें सांगितलें ह्मणजे पुरे आहे. आतां यांतच 'श्रुतिस्मृतींत नसलेला महालय ( श्राद्ध भाद्रपदकृष्णपक्षांत करावयाचें ) पुढें आला' अशा अर्थाचें एक विधान व्याख्यानकारांनीं केलें आहे. तें मात्र बरोबर दिसत नाहीं. कारण महालयसंबंधानें मनुस्मृतींत-

> 'अनेन विधिना श्राद्धं त्रिरब्दस्येह निर्वपेत् ।
> हेमन्त-ग्रीष्म-वर्षासु पाञ्चयज्ञिकमन्वहम् ॥'

ह्मणजे वर्षांतून हेमन्त, ग्रीष्म, व वर्षा या तीन ऋतूंत तीन वेळां पूर्वीं सांगितलेल्या विधीनें श्राद्ध करावें व पंचमहायज्ञांपैकीं जें एक श्राद्ध—पितृयज्ञ—तें रोज करावें. असें सांगितलें आहे. यावरून महालय श्राद्ध करावें हें सिद्ध होतें. कारण

चैत्रादि दोन दोन महिन्यांनीं एकेक ऋतु बदलतो, या पक्षानें मानलें ह्मणजे वर्षाऋतु भाद्रपद अखेरपर्यंत रहातो. हेंच या स्मृतीचे टीकाकार कुल्लूकभट्ट यांनीं आपल्या टीकेंत सिद्ध केलें आहे. तें असें:—

'हेमन्त-ग्रीष्म-वर्षासु श्राद्धं कर्तव्यं तच्च समयाचारात् कुम्भ-वृष-कन्यास्थेऽर्के पञ्चमहायज्ञान्तर्गतं च 'एकमप्याशयेद्विप्रम्' इत्यनेन विहितम्'

( हेमन्त, ग्रीष्म व वर्षा या तीन ऋतूंत श्राद्ध करावें आणि तें समयाचारानें क्रमानें हेमन्तऋतूंतील कुंभसंक्रांतीस सूर्य गेला असतां, ग्रीष्मऋतूंतील वृषभसंक्रांतीस सूर्य असतां व वर्षाऋतूंतील कन्यासंक्रांतीस सूर्य असतां करावें. )

यावरून महालय स्मृति वगैरे ग्रंथांतून बाह्य नसून स्मृति-वगैरे धर्मशास्त्रविहितच आहे हें सिद्ध होतें. इतकेंच नाहीं तर पराशर वगैरे अन्य स्मृतिकारांनीं व निर्णयसिंधुसारख्या महा-विद्वान् ग्रंथकारांनींहीं महालय श्राद्ध भाद्रपदकृष्णपक्षांत नित्य करावें असें सांगितलें आहे. याशिवाय या विषयासंबंधानें मला आणखी कांहीं सांगावयाचें नाहीं.

आतां 'गणानां त्वा' संबंधानें थोडक्यांत एवढेंच सांगावयाचें कीं, हा मंत्र अन्यदेवतेचा नसून फक्त गणपतीचाच आहे. कारण ब्रह्मणस्पति ह्मणजेच गणपती असें समजण्याचा वैदिक संप्रदाय आहे. आणि गणपति ह्मणजे जशी सरस्वती त्याचप्रमाणें वाग्देवता समजण्याचा संप्रदाय आहे; व हा संप्रदाय आजका-लचा नसून फार प्राचीन कालापासून—उपनिषत्कालापासूनचा आहे. कारण बृहदारण्यक उपनिषदांत एके ठिकाणीं 'ब्रह्म—वाणी त्याची देवता ह्मणून ब्रह्मणस्पति' अशा अर्थाचें एक वाक्य आहे व तें याच गणपतीच्या संबंधानें आहे. ह्मणून वरील एक मन्त्रच

नव्हे परंतु 'गणानां त्वा' या मन्त्रापासून हें १९ ऋचांचें सूक्त ब्रह्मणस्पतीचें—गणपतीचेंच—आहे. व सदर्हु मन्त्राचा अर्थही त्याला अनुकूल आहे. तो येणेंप्रमाणें:-

'हे ब्रह्मणस्पते—अन्नाचें किंवा मुख्य कर्माचें पालन करणाऱ्या, गणांच्या—देवादिसमुदायांच्या पतीला, कवींच्या—झालेलें जाणणाऱ्यांच्या कवीला, उपमश्रवस्तमं—सर्व अन्नाला उपमानरूप आहे अन्न ज्याचें अशा, ( ह्याच्या प्रसन्नतेनें जें अन्न प्राप्त होतें तें सर्वांस उपमा देण्याइतकें उत्तम असतें असा भाव. ) ज्येष्ठ—श्रेष्ठ जे लोक त्यांच्यामध्यें राज ह्मणजे शोभणारा अशा, व मन्त्रांच्या अधिपतीला हवामहे—या कर्मामध्यें तुला बोलावतों. आणि असें प्रार्थितों कीं, आमच्या स्तुती ऐकून ऊती—पालनांचीं साधनें त्यांसहित सादन— यज्ञगृह त्याचे ठायीं सीद उपवेशन कर—बैस.' हा अर्थ सदरील मन्त्राच्या 'गणानां त्वा गणपतिं हवामहे कविं कवीनाम् उपमश्रवस्तमम् । ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणस्पते आ नः शृण्वन् ऊतिभिः सीद सादनम् ।' या पदांचा समजावा. व हा ऋग्वेदावरील सायनाचार्यांच्या भाष्याला अनुसरून अर्थ केला आहे. तेव्हां यांत गणपतीसंबंधानेंच सर्व वर्णन असतां या मन्त्रासंबंधानें बिचाऱ्या वैदिकांवर अथवा याज्ञिकांवर यथेच्छ तोंडसुख घेणें बरोबर नाहीं असें मला वाटतें. आतां 'शन्नो देवी,' 'आप्यायस्व' व 'दधिक्राव्णो' इत्यादि मन्त्रांसंबंधानें जरी ज्या ज्या ठिकाणीं उपयोग करितात त्या त्यासंबंधी अर्थ नसला तरी लिंगोक्त देवता घ्याव्या असें भाष्यकार, सर्वानुक्रमकार वगैरे ग्रंथकारांचें ह्मणणें आहे. त्याप्रमाणें 'शंनो देवी' वगैरे मन्त्रांत किंवा 'शमग्निरग्निभिः' या मन्त्रांत—हाही मन्त्र शनीचा समजण्याचा संप्रदाय आहे—शनीचें वर्णन नाहीं तरी त्याचें लिंग—'शंन'

इत्यादि चिन्ह—असल्यामुळें शनीसंबंधानें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं. याचप्रमाणें 'आप्यायस्व' वगैरे मन्त्रांची गति समजावयाची. ह्मणूनच व्याख्यानकारांनीं ज्यांनीं मन्त्रांचा अशा रीतीनें उपयोग करण्याची रीति प्रचारांत आणिली त्यांच्यावर अर्थाज्ञानाचा आरोप केला आहे तो बरोबर नाहीं. कारण त्यांनीं जे नवग्रहांचे मन्त्र ठरविले आहेत किंवा निरनिराळ्या देवतांचे, ते अर्थ समजूनच केले आहेत. उदाहरणार्थ 'आकृष्णेन रजसा' हा मन्त्र सूर्याचा समजण्याचा प्रघात आहे तो या मन्त्रांत सूर्याचें वर्णन आहे ह्मणूनच आहे. तेव्हां असें ह्मणावें लागतें कीं, मन्त्र व त्यांच्या देवता ठरवणारांनीं त्या त्या देवतेसंबंधानें अर्थानुकूल्य ज्या मन्त्रांत मिळालें तेवढे तसे घेतले व ज्या मन्त्रांत मुळींच अर्थानुकूल्य तर मिळत नाहीं परंतु यत्किंचित् नांव किंवा त्याचा एक देश आढळतो ते त्यांच्या लिंगावरून ठरविले आहेत असें समजावें. आणि मन्त्रपाठ ह्मणून जो करावयाचा तेथें फारशी अर्थाची अपेक्षा नसते. तर फक्त देवतेवर भाव असून स्वरवर्णयुक्त मन्त्रोच्चारण नीट केलें ह्मणजे सिद्धि होते असें समजण्याचा व त्याप्रमाणें थोडा अनुभवाचाही प्रचार आहे. असो. येथपर्यंत माझ्या बुद्ध्यनुसार व अवकाशानुसार जेवढा विचार करवला तेवढा केलेला आहे, तेव्हां यांतील युक्तायुक्तविचार व ग्राह्याग्राह्यविचार सर्वथा श्रोत्यांवर व वाचकांवरच सोंपवून व मूळ व्याख्यात्यांसंबंधानें जर कांहीं कमजास्त शब्द गेला असेल तर त्याबद्दल त्यांची माफी मागून व आपले सर्वांचे आभार मानून मी आपलें भाषण पुरें करितों.

ॐ तत् सत् ॥